GLOBAL Group Enterprise

GTL INFRASTRUCTURE

# GTL Infra buys Aircel towers for $1.8 billion

Publication: Prahar, Date: January 13, 2010

## विचार



सध्याच्या व्यवस्थापनाची समस्या म्हणजे अंतिम परिणाम साधण्यासाठी अधिक वेळ खर्च होण्याऐवजी बराचसा वेळ नियमित कामात जातो. आमच्या माणसांकडून आमच्या काही विशिष्ट अपेक्षा आहेत; पण आम्ही त्या काही लिखित स्वरूपात तयार केलेल्या नाहीत. या विषयावर परस्परसंपर्क असतो. पाच वर्षांपूर्वी प्रत्येकाला 'रिलायन्स'सारखं व्हायचं असायचं, आता प्रत्येकाला 'इन्फोसिस'सारखं व्हायचं आहे; पण का आणि कसं? यातलं 'कसं' ही एका संस्कृतीची अथवा वैशिष्ट्याची जोपासना आहे. त्यासाठी वर्षानुवर्षं योजना आखणं आणि बांधिलकी असणं गरजेचं आहे आणि तरी ते काही कायमस्वरूपी आदर्श असणार नाही. 'कायमस्वरूपी असा कुठला आदर्श नाही. १२५ वर्षांपूर्वी रिलायन्स यशस्वी नव्हती आणि अजून १५ वर्षांनंतर इन्फोसिस आघाडीवर राहील, असंही नाही. एखादी गोष्ट चालतीय (वर्किंग) किंवा चालत नाही, हे माझी माणसं मला सांगू शकतात का? कधी-कधी मला वाटतं, की मी माझ्या अपेक्षा सुस्पष्ट शब्दांत व्यक्त करायला कमी तर पडत नाही!

■ मनोज तिरोडकर